# आज आर्थिक विकास हा प्रामुख्याने देशातील कायद्याच्या चौकटीवर अवलंबून : अक्षत खेतान

**पुणे :** (समर्थ गांवकरी)

एयू कॉर्पोरेट ॲडव्हायजरी ॲंड लीगल सर्व्हिसेस (एयूसीएल) ही कॉर्पोरेट व्यूहरचना, आर्थिक सल्ला, कर्ज करार (डेट सिण्डिकेशन) आणि दावे-खटले लढवण्याच्या सेवा पुरवणारी आघाडीची मुंबईस्थित फर्म आहे.

एयूसीएल आपल्या क्लाएंट्सना व्यवहार्य व नवोन्मेषकारी उपाय सुचवून जटील आव्हानांमधून मार्ग काढण्यास मदत करते. त्यामुळेच सर्वसमावेशक सहाय्य हवे असलेल्या संस्थांसाठी ही फर्म विश्वासाचा सहयोगी आहे.

एयूसीएल सर्वांगीण दृष्टिकोनासाठी 360 डिग्री (सर्व बाजूंनी) विचारप्रक्रियेचा अवलंब



करते. त्यामुळे ह्या सर्वांच्या पसंतीच्या विधीविषयक फर्मला विविध आव्हानांबाबत मूलभूत माहिती मिळवण्यात मदत होते. प्रत्येक आव्हानाकडे विविध दृष्टिकोनांतून बघितले जाऊ शकते आणि त्यासाठी खास तयार करण्यात आलेली अर्थात टेलर्ड व्यूहरचना आवश्यक असते, ह्यावर एयूसीएलचा ठाम विश्वास आहे. मूल्यनिर्मितीच्या कार्यात्मक नियमाचे पालन करून एयूसीएलने असंख्य क्लाएंट्सची कामे यशस्वीरित्या पार पाडण्यात मदत केली आहे.

अनन्यसाधारण सेवा : एयूसीएलने आपल्या अनन्यसाधारण सेवांच्या माध्यमातून उद्योगक्षेत्रात स्वत: स्थान निर्माण केले आहे. ह्यात नियामक पूर्तता, धोरण विकास व अंमलबजावणी, कॉर्पोरेट प्रशासन, बौद्धिक संपदा हक्कांची नोंदणी, संरक्षण व प्रवर्तन तसेच समभाग भांडवल आणि अन्य वितरणांशी संबंधित प्रकरणांचा समावेश होतो.

एयू कॉर्पोरेट ॲंड लीगल ॲडव्हायजरी सर्व्हिसेस लिमिटेडचे (एयूसीएल) संस्थापक अक्षत खेतान ह्यांनी ह्यावेळी बोलताना उद्योगक्षेत्रातील व्यापक बदलांचे समर्थन केले. प्रकरणांवर तोडगा काढण्यासाठी स्पष्ट मार्ग आखून दिला जाण्याची गरज आहे ह्यावर त्यांनी भर दिला. त्याचबरोबर तरुण व्यावसायिकांमध्ये व्यावसायिक मानसिकतेला उत्तेजन देणे, डिजिटल स्पर्धेचे व्यवस्थापन करण्यासाठी नियमांची चौकट प्रस्थापित करणे आणि राज्य स्तरांवरील कर मोडीत काढून इंधन व वीज हेदेखील वस्तू व सेवा कराच्या (जीएसटी) कक्षेत आणणे ह्या मुद्द्यांचेही त्यांनी समर्थन केले."